# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 148/2023  दिनांक : 12.04.2023**

## 1)जबरी चोरी :–

**धर्माबाद** :–दिनांक 10.04.2023 रोजी सायंकाळी 18.30 वा. चे सुमारास, **विळेगाव ते पिंपळगाव जाणारे रोडवरील कॅनाल जवळ ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो सा क्रमांक एमएच–26/एक्स–6326 वर बसुन सोन्या चांदीचे बॅग घेवुन करखेली ते कारेगावकडे जात असतांना चार अनोळखी इसमांनी फिर्यादीचे मो सा चा पाठलाग करून फिर्यादीचे मो सा ला पाठीमागुन धडक देवुन खाली पाडुन अंगावर मिरची पुड टाकुन चाकुचा धाक दाखवुन फिर्यादी जवळील बॅग ज्यात सोन्याचे दागीने किंमती 86.05 ग्रॅम किंमती 5,01,700/–रूपये व चांदीचे आठ किलो वजनाचे दागीने किंमती 5,60,000/–रू व नगदी 41,950/–रूपये असा एकुण 11,03,560/–रूपयाचा ऐवज लुटून जबरीने चोरून घेवुन पळुन गेले. धर्माबाद पोलीसांनी कांही तासातच चार आरोपी निष्पन्न करून त्या पैकी एक आरोपी अटक केला आहे. वगैरे **फिर्यादी अर्जित वसंत माने, वय 31 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मांजरडे ता. तासगाव जि. सांगली ह. मु. कारेगाव फाटा ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 72/2023 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री शिंदे, मो.क्रं. 9423193741** हे करीत आहेत.

## 2)कलम 380 चोरी :–

**1)मुक्रामाबाद** :–दिनांक 14.04.2023 रोजी 12.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौ. वसुर तांडा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घरात चोरी करत असतांना फिर्यादीचे मुलास जाग आल्याने व त्याने चोर आले म्हणुन आरडा ओरड केल्याने संशयीत चोर पळुन जात असतांना त्यांना फिर्यादी व गावकऱ्यांनी पकडुन ठेवले व पोलीसांना बोलावुन घेवुन पोलीसांच्या ताब्यात देवुन सदर आरोपीतां विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यात आली. सदर आरोपीचे ताब्यात एक खंजर मिळुन आला. वगैरे **फिर्यादी शेषेराव लालसिंग चव्हाण, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती व ड्रायव्हर रा. वसुर तांडा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 83/2023 कलम 380, 34, भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.क्र. 9975802890** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)अर्धापुर** :– दिनांक 09.04.2023 रोजी चे 18.30 ते 19.00 व 19.00 ते 20.00 वा. चे दरम्यान, **सत्यगणपती दाभड रोड वरून ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादची हिरो स्पलेंडर प्लस कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/बीएन–9260 किंमती 30,000/ रूपयाची व साक्षीदार यांची स्पलेंडर प्लस कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/बीजी–7241 किंमती 35,000/–रूपयाची अशा एकुण दोन मो सा ली कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मारोती पि. बालाजी पांचाळ, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. लक्ष्मीनगर माळटेकडी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 102/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215 पाटील, मो. क्रं. 9322857773** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**1)मुखेड** :– दिनांक 10.04.2023 रोजी चे 11.50 वा. चे सुमारास, **महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समतीशिवाय लबाडीच्या इराध्याने बँक मधील नगदी पन्नास हजार रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शिवराज शंकरराव हिवराळे, वय 30 वर्षे व्यवसाय नौकरी रा. जांभळी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 101/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भारती, मो. क्रं. 9850571142** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 07.04.2023 रोजी चे 23.30 ते दि. 08.04.2023 चे 08.00 वा. चे दरम्यान, **मौ. तुप्पा वसाहात ता. जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने तुप्पा पाटबंधारे वसाहत येथे मोकळया जागेत ठेवलेले कोल्हापुरी बंधाऱ्याचे लोखंडी 17 गेट किंमती 1,02,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी फरमान पि. नासीर बागवान, वय 28 वर्षे, व्यवसाय नौकरी अभियंता श्रेणी व जलसंपदा विभाग जंगमवाडी रा. लेबर कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 253/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/581 मांजरमकर, मो. क्रं. 9823333377** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :–** दिनांक 11.04.2023 रोजी चे 12.15 वा. चे सुमारास, **चांदोजी पावडे मंगल कार्यालयाचे जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही तीचे मुलांना शाळेतुन आणण्यासाठी जात असतांना फिर्यादीचे डावे पायाचे बुटात खडा गेल्याने ती पायातील खडा काढण्यासाठी हातातील पर्स बाजुच्या मो सा वर ठेवुन खडा काढीत असतांना यातील तीन अनोळखी आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे मो सा वर ठेवलेली पर्स ज्यामध्ये नगदी 20,000/–रूपये व पोको कंपणीचा मोबाईल किंमती 6,000/–रूपयाचा असा एकुण 26,000/–रूपयाचा माल असलेली पर्स चोरून नेली. वगैरे **फिर्यादी हरीबाई भ्र. गजानन पाटील, वय 35 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. राधे माधव प्लाझा चांदोजी पावडेवाडी मंगल कार्यालय जवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 140/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार , मो. क्रं. 9028846691** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**1)मनाठा :–** दिनांक 11.04.2023 रोजी चे 13.19 वा. सुमारास, **बामणी शिवार ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा बरड शेवाळा उपकेंद्र अंतर्गत मौ. बामणी शिवारात अकरा केवी फिटरचा एक तार तुटून शेतातील शेळयावर पडुन शेळया मृत झाल्याची माहिती मिळाल्याने फिर्यादी व त्यांचे दोन सहकारी असे मिळुन घटनास्थळाचा पंचनामा व व मरण पावलेल्या शेळयांचे फोटो काढण्यासाठी जात असतांना फिडरचा कट पॉईंट कट करून घेण्यासाठी जात असतांना यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. त्यातील एकाने डोक्यात दगड मारून डोके फोडले व सहकारी विठठल चव्हाण यांना इतर लोकांनी मारहाण केली व फिर्यादीचे कॉलर धरून शर्टच्या दोन गुंडया तोडल्या व पाठीत बुक्कयांनी मार दिला. फिर्यादी हा शासकीय कर्तव्य पार पाडीत असतांना शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी प्रदीप भीमराव नरनवरे, वय 39 वर्षे, व्यवसाय कनिष्ठ अभियंता महावितरण शाखा मनाठा ता. हदगांव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 36/2023 कलम 353, 332, 323, 141, 143, 146, 147, 148, 149, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्र. 9923413244** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**1)लोहा :– ऑक्टोबर** 2019 पासुन ते दिनांक 05.02.2023 चे दरम्यान, **सासरी व्यंकटेशनगर कंधार ह. मु. नवघरवाडी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस दुकान टाकण्यासाठी माहेरा वरून पैसे घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 84/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2483 साखरे, मो.क्रं. 9823015483** हे करीत आहेत.

## 7)शासकीय आदेशाचे उल्लंघन :–

**मुदखेड :–**दिनांक 10.04.2023 रोजी चे 16.00 ते 20.45 वा. चे दरम्यान, **मदुखेड शहरात ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठरा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या सार्वजनिक रोडवर मुदखेड शहरात रामनवमी शोभायात्रीची मिरवणुक काढुन साऊंड सिस्टीम लाऊन त्याचा मर्यादेपेक्षा जास्त आवाज करून मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे शासकीय आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी सपोनि/राजु दत्तात्रय वटाणे, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 66/2023 कलम 188, भादवि, 134, 135 मु. पो. का. 15 पर्यावरण अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1375 ठाकुर, मो.क्रं. 77740511375** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**मरखेल :–** दिनांक 11.04.2023 रोजी 14.45 वा. चे सुमारास, **होटटल चौरस्ता मौ. होटटल ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 9300/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/घनश्याम परशुराम वडजे,. ने. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 67/2023 कलम 65 (ई), 83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ 2505 कदम, मो.नं. 9923606729** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड